# मुलांनो अब्राहामासारखा येशूवर वि श्वास ठेवा

**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गातील बापा, तुझ्या पवित्र आत्म्याच्या द्वारे मुलांमध्ये विश्वासाची बांधणी करण्यासाठी कृपा करून या अभ्यासाचा उपयोग करून घे, त्यांनी दररोज खऱ्या विश्वासाने आणि अंत: करणातील भक्तीने प्रार्थना करण्यास त्यांना साहाय्य कर. येशूच्या नावात आमेन.''

मुलांचे वय आणि गरजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

अब्राहामाच्या विश्वासू जीवनातील पुढील मुख्य घटना मुलांना थोडक्यात सांगा:

1) **अब्राहामाने वि श्वासाने प्रवास केला.** अब्राहामाने देवाचे आज्ञापालन केले. त्याने आपला समृद्ध पण मूर्तीपूजा करणारा देश सोडला. देवावरील विश्वासामुळे त्याने आपल्या कुटुंबासह दूरवरच्या अनोळखी देशात प्रवास केला, (उत्पत्ती अध्याय 12)

2) **अब्राहामाने वि श्वासाने उदारपणे दिले.** अब्राहामाचे गुराखी आणि त्याचा पुतण्या लोट ह्याचे गुराखी ह्यांच्यामध्ये त्यांच्या गायी व मेंढया सर्वोत्तम कुरणात चारण्यावरून भांडणे होऊ लागली. अब्राहामाचा देवावर विश्वास असल्यामुळे त्याने भांडण तंटा टाळण्यासाठी लोटाला चांगली कुरणे असलेला प्रदेश घेऊ दिला. लोटाने स्वार्थीपणाने चांगली कुरणे असलेली जमीन धेतली पण देवाने अब्राहामाला आशीर्वादित केले (उत्पत्ती अध्याय 13)

3) **अब्राहामाने वि श्वासाने धाडसीपणाने युद्ध केले.** लोटाने समृद्ध संपन्न अशा मूर्तीपूजक सदोम शहरात राहणे पसंत केले. एक दिवशी, पाच दुष्ट राजांनी सदोम जिकूंन घेतले, तेथील लोकांना गुलाम म्हणून नेले आणि त्यांच्या मोलवान वस्तूही लूटल्या, तथापि, अब्राहाम व त्याच्या गुराख्यांनी त्या पाच राजांचा पराभव करून लोटाचे कुटुंबीय आणि लोकांची सुटका केली. म्हणूनच अब्राहामाने सर्व मालमत्ता त्याच्याजवळ ठेवून बंदिवान करून नेलेल्या लोकांना परत करावी अशी विनंती सदोमाच्या राजाने केली. अब्राहामाने मालमत्ता आणि लोक अशा दोन्ही गोष्टी राजाला परत केल्या (उत्पत्ती अध्याय 14)

- आकाशातील सर्व चांदण्या मोजण्यास किती वेळ लागेल हे मुलांना विचारा. अब्राहामाची संतती तितकी होणार आहे ह्या देवाच्या अभिवचनावर त्याने विश्वास ठेवला हे किती अद्‌भुत आहे याचे स्पष्टीकरण करा.
- मुलांनी दररोज वैयक्तिक आणि आपल्या कुटुंबियांबरोबर प्रार्थना केली पाहिजे हे त्यांच्या मनावर ठसवा.


What Abraham Saw

4) **अब्राहामाने देवाच्या अभिवचनावर विश्वास ठेवला,** देवाने अब्राहामाशी सार्वकालिक करार केला होता. त्याच्या संतती द्वारे म्हणजे वंशज सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करण्याचे अभिवचन दिले होते. तथापि, त्याची पत्नी सारा वृद्ध झाली होती अणि मूल होण्याचे तिचे वय उलटून गेले होते. एक दिवस, देवाने अब्राहामाला आकाशातील ताऱ्यांकडे पहायला सांगितले. देवाने अब्राहामाला अभिवचन दिले की आकाशातील ताऱ्यांइतकी त्याची संतती बहुगुणित होईल. अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि त्याचा विश्वास देवाने नीतिमत्व असा गणला. देवाने दिलेले अभिवचन पाळले आणि साराच्या पोटी इसहाकचा जन्म झाला.

आजपर्यन्त, देव पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना अब्राहामाचे संतान, येशूच्या द्वारे आशीर्वाद देत आहे. (उत्पत्ती अध्याय 15, 17 व 21)



**All Nations of the Earth**

5) **अब्राहामाने वि श्वासाने प्रार्थना केली.** एके दिवशी, प्रभुच्या दूताने अब्राहामाला येऊन सांगितले की सदोमातील लोक अत्यंत दुष्ट असल्याने देव त्यांचा नाश करणार आहे. सदोममध्ये राहणारा लोट व त्याच्या कुटुंबाचा बचाव करण्याची काकुळतीची विनंती अब्राहामाने देवाला केली. अब्राहामाच्या विश्वासामुळेच केवळ त्यांचा बचाव करण्यासाठी देवाने आपले दूत पाठवले. मग त्याने सदोमावर अग्नीचा वर्षाव करून ते पूर्णपणे नष्ट केले. (उत्पत्ती अध्याय 18-19)

6) **अब्राहामाने हृदयभंग करणारी देवाची आज्ञा वि श्वासाने पाळली,** एके दिवशी, अब्राहामाच्या विश्वासाची परीक्षा घ्यावी असे देवाला वाटले; म्हणून त्याने त्याच्या एकुलत्या एका मुलाचे, इसहाकाचे होमार्पण करण्याची आज्ञा केली. याच मुलाच्याद्वारे देवाने दिलेली सर्व अभिवचने पूर्ण होणार होती. अब्राहामाने आपल्या मुलाचे होमार्पण करव्याची तयारी केली, देव त्याला मरणातून पुन्हा उठविल हे त्याला ठाऊक होते. अचानक देवाने अब्राहामाला त्याच्या मुलाऐवजी एक एडका होमार्पणासाठी दिला (उत्पत्ती अध्याय 22; इब्री 11:17-19)

7) **अब्राहामाच्या सत्कृत्यांनी त्याचा वि श्वास दांडगा असल्याचे दाखवले.** देवाने अब्राहामाला नीतिमान ठरवले आणि त्याच्या सत्कृत्यांमुळे नाही तर त्याच्या विश्वासामुळे त्याला आशीर्वादित केले. अब्राहामाच्या विश्वासाने त्याला सकृत्ये करण्यास प्रवृत्त केले. (याकोब 2:21-24)


चार मोठया मुलांना विश्वासाचे चिन्ह दाखवणाऱ्या चार वस्तु आणायला सांगा अशा गोष्टी मिळवणे सोपे नसेल तर पुढील चार वस्तूंचे चित्र काढा.

साबणाची वडी.

सुरी

एक लहान बाटली (किंवा औषधाची गोळी)

एक वधस्तंभ (दोन काठया एकमेकींना बांधलेल्या)



**वधस्तंभ तयार करण्यासाठी दोन काठया एकत्र बांधा.**

- पहिला मुलगा: साबण दाखवून विचारा ''साबणाने आपली पातके आपल्याला धुऊन टाकता येतील का?'' (मुलांना उत्तर देऊ द्या)
- दुसरा मुलगा: सुरी दाखवून विचारा, ''सुरीच्या सहाय्याने डॉक्टरांना आमचे पातक कापता येईल का?''
- तिसरा मुलागा: बाटली दाखवून विचारा, ''आमचे पातक बरे करण्यासाठी आम्हांला औषध घेता येईल का?''

- चौथा मुलगा: वधस्तंभ दाखवून विचारा, ''आमचे पातक कोण दूर करील?''

**स्पष्ट करा:** वधस्तंभावर सांडलेले ख्रिस्ताचे रक्तच फक्त आमचे पातक धुऊन स्वच्छ करते. आम्ही येशूवर विश्वास ठेवणे अगत्याचे आहे. आमच्या पातकांची क्षमा करून आम्हांला सार्वकालिक जीवन देण्यासाठी तो मेला आणि पुन्हा उठला.

अब्राहामाच्या वृत्तांताच्या भागांचे नाट्यीकरण करा. उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून नाटिका सादर करव्याची व वरील चार वस्तू उदाहरणे म्हणून दाखवण्याची व्यवस्था करा.

- देवाची वाणी व अब्राहाम ह्या भूमिका मोठया मुलांना वा प्रौढांना द्या.
- सारा व दास-दासी ह्या भूमिका लहान मुले करतील.

**देवाची वाणी:** ''अब्राहाम, तू माझ्या अभिवचनावर विश्वास ठेवलास म्हणून आकाशातील ताऱ्यांइतकी मी तुझी संतती बहुगुणित करीन.''

**अब्राहाम:** वर आकाशाकडे पाहून म्हणा, ''आकाशातले तारे तर मला मोजताही येत नाहीत सर्वसमर्थ देवा माझा तुझ्यावर विश्वास आहे. तुला काहीही करता येणे शक्य आहे.''

**देवाची वाणी:** ''तुझ्या माझ्यावरील विश्वासामुळे मी तुला नीतिमान ठरवतो आणि मी तुला व तुझ्या संततीच्याद्वारे सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करीन.''

**अब्राहाम:** ''पण मला तर मुले नाहीत आणि पत्नी सारा तर खूप म्हातारी झाली आहे तसेच मूल होण्याचे तिचे वयही नाही.''

**देवाची वाणी:** माझ्यावर विश्वास ठेव. तुझ्या पत्नीला साराला मूल होईल.''

**अब्राहाम:** साराकडे जाऊन, ''तुला मूल होईल असे देवाने आभिवचन दिले आहे.''

**सारा:** हसा. मग दास दासींना म्हणा, ''अब्राहामाने मला काय सांगितले ते तुम्ही ऐकले का? मला मूल होणार असे त्याने म्हटले!''

**दास-दासी:** हसा आणि मग म्हणा, ''परंतु मूल होण्याचे तुमचे वय केव्हाच उलटून गेले, तुम्ही तर म्हाताऱ्या झालात!''

''अशी काही गोष्ट घडेल असे म्हाणारा अब्राहाम स्वत:ला समजतो तरी कोण?''


''धन्याचा हा विनोद चांगला आहे!''

**अब्राहाम:** ऐकणाऱ्या सर्व लोकांना उद्देशून म्हणा, ''देवाने आपले अभिवचन पाळले. त्याने अद्‌भुत चमत्कार केला. साराने आमच्या मुलाला इसहाकाला जन्म दिला. इसहाकाच्या संततीच्या द्वारे सर्व राष्ट्रें आशीर्वादित होतील. हा येशू आहे.''

(नाटिकेसाठी साहाय्य करणाऱ्यां प्रत्येंकाचे आभार माना)

मुलांना ज्वालामुखीचे चित्र काढायला सांगा. मोठया मुलांना लहान मुलांची मदत करायला सांगा मुले आपआपली चित्रे मोठया माणसांना उपासनेच्या केळी दाखवून सांगतील की:

- ज्वालामुखीच्या उद्रेकातून झालेल्या अग्नी वर्षावाने लोकांचा बळी घेतला आहे; सदोमातील दुष्ट लोकांचाही आकाशातून कोसळलेल्या अग्नीने असाच अंत झाला.
- यावरून येशूची ओळख नसणाऱ्यांसाठी आपण प्रार्थना का करतो हे समजते अब्राहामाने सुद्धा लोटाच्या कुटुंबाचे अग्नीपासून रक्षण व्हावे यासाठी प्रार्थना केली.



**कविता.** चार मुलांना स्तोत्र 34 वचने 4,7,8 व 9 यातील प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

अब्राहाम व त्याची प्रार्थना याविषयी मोठया मुलांना लहानशी कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**पाठ करा इब्री 11:1**

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु तू आम्हांला दिलेल्या अभिवचनां बद्दल तुला धन्यवाद देतो. तुझ्या सर्व बोलव्यावर आमचा भरवंसा आहे. अब्राहामाने ठेवला तसाच दृढ विश्वासाने आम्ही तुझ्यावर भरवसा ठेवतो त्याने इतरांसाठी प्रार्थना केली तशीच प्रार्थना करण्यास आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net